# मुंबई विद्यापीठ

क्र. टीएएएस(युटी/सीटी)/११ /२०१९–२०२०

परिपत्रक :—

विषय : मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद
याचिका क्र. १२१२२/२०१७ मधील अवमान याचिका क्र.३६०/२०१९
असोशिएशन कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अॅन्युएटेड टीचर्स
विरूद्ध
महाराष्ट्र शासन व इतर

संदर्भ : १) शासन पत्र क्र.न्यायाप्र/२०१७/प्र.क्र. ४१९/१७/विशि–१ दि. २४ जुलै,२०१९
२) क्र.ससं/उशि/मुंवि/न्यायालयीन/२०१९/१६९३ दि.४ सप्टेंबर, २०१८

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व कायम विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांच्या निदर्शनास आणून देण्यात येते की, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांचे दिनांक २६ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रात उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे असोशिएशन ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अॅन्युऐटेड टीचर्स यांनी याचिका क्र. १२१२२ /२०१७ दिनांक ०६/१०/२०१७ च्या आदेशाचे अनुपालन न झाल्यामुळे अवमान याचिका क्र. ३६०/२०१९ दाखल केली. शासनाच्या वतीने दाखल केलेली याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्याने मा. उच्च न्यायालयालच्या आदेशाच्या अनुषंगाने यासंदर्भात शासन स्तरावरून धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील ज्या अधिव्याख्यात्याने दि. ०१/०१/१९९६ पुर्वी पीएच. डी अर्हता धारण केलेली आहे, त्या अधिव्याख्याताांना दि. २७/०७/१९९८ ला पीएच. डी च्या दोन आगाऊ वेतनवाढी देण्यात आलेली आहे. सदर अधिव्याख्यात्यांना दि. २७/०७/१९९८ ऐवजी दि. ०१/०१/१९९६ पासुन पीएच. डी च्या आगाऊ दोन वेतन वाढी अनुज्ञेय केल्यास किती आर्थिक भार पडेल याबाबतची माहिती खालील तक्त्यात सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई यांच्या jdhemumbai@gmail.com या इमेल आयडीवर तात्काळ सादर करावे.

| अ.क्र. | अधिव्याख्यात्यांचे नाव | पीएच डी अर्हता प्राप्त केलेला दिनांक | पीएच डीच्या दोन आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्याचा दिनांक | दि. ०१/०१/१९९६ पासुन पीएच डी चा दोन आगाऊ वेतन वाढी मंजुर केल्यास येणारा आर्थिक भार |
|---|---|---|---|---|
| | | | | |

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– १८ ऑगस्ट, २०१९

(दत्ता घुगे)
उपकुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानित, पारंपारिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचे प्राचार्य व संबंधीत संस्थाचे अध्यक्ष/ सचिवयांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. सह—संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई — ४०० ००१.
२. मा. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
३. स्वीय सहायक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
४. स्वीय सहायक, प्रभारी कुलसचिव, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
५. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, मुंबई — ४०० ०९८.
६. जनसंपर्क अधिकारी, मुंबई विद्यापीठ, मुंबई — ४०० ०३२.
७. सचिव, मुंबई विद्यापीठ, प्राचार्य संघटना, प्रगती महाविद्यालय, डोंबिवली—४२१ २०१.
८. डॉ.टी.ए. शिवारे, अध्यक्ष, A.M.G.C. Director, विल्सन महाविद्यालय, चौपाटी, मुंबई—४००००७.
९. मुप्ता (MUPTA) संघटना, १०३, गोराई, सम्राट अशोक को. हाऊ. सोसायटी, प्लॉट नं. १०२, गोराई—२, बोरिवली (पश्चिम), मुंबई— ४०० ०९१.
१०. मा. अध्यक्ष (UMASA), समाजशास्त्र विभाग, रानडे भवन, कलिना, मुंबई — ४०० ०९८.
११. मा. अध्यक्ष (MUCTA), खोली नं ४७, रानडे भवन, कलिना, मुंबई — ४०० ०९८.